# सामाजिक बदलासाठी कटिबद्ध : आसमंत फाउंडेशन

**संगीत, मुले, निसर्ग म्हणजेच परमेश्वर आहे. यांच्या माध्यमातून विविध रूपाने त्याचे दर्शन घडत असते. या तिन्हींचे संवर्धन आणि त्याची काळजी घेण्यासाठी रत्नागिरीतील नंदकुमार पटवर्धन प्रयत्नशील आहेत. त्यांची 'आसमंत बेनेवोलन्स फाउंडेशन' ही संस्था गेली ९ वर्षे भविष्यातील नवी पिढी सक्षम व्हावी, म्हणून मुलांचा सर्वांगीण विकास, भारतीय संगीताचा प्रसार, निसर्गाचे संवर्धन व संगोपन या तीन क्षेत्रांमध्ये काम करत आहे. पटवर्धन यांची तळमळ पाहता त्यांच्या उपक्रमांना सामाजिक पाठबळ मिळावे, या हेतूने आसमंतच्या वाटचालीबद्दल लिहीत आहे. संगीत, मुले, निसर्ग यांचे संगोपन, संवर्धन व वृद्धी ही समाजाच्या हातात आहे, याची जाणीव करून देणाऱ्या आसमंतच्या उपक्रमांची ही ओळख...**

- दत्तप्रसन्न कुलकर्णी
sanna.kulkarni@gmail.com

आनंद हा मानण्यावर असतो, परंतु स्वतः नेहमी आनंदी राहून तो इतरांना वाटण्यात आनंद मानणारे नंदकुमार पटवर्धन यांची भेट घेतली. पावलोपावली हिशोब घालून आपल्या व्यवसायातील मिळकतीची सर्व रक्कम संगीत, मुले, निसर्ग यांच्या संवर्धनासाठी खर्च करणारा अवलिया मला पटवर्धन यांच्या रूपाने भेटला. त्यांच्याशी बोलताना जाणवले की, त्यांच्या प्रयत्नांमागे एक तत्त्वज्ञान आहे.

गप्पांची सुरवात गाणं व संगीत यावरून झाली. पटवर्धन म्हणाले, गाणं हे गाणाऱ्याला आणि ऐकणाऱ्याला आनंद तसेच आनंदच देते. मी गणपतीची आरती म्हणताना सुखकर्ता दुःखहर्ता असे न म्हणता सुखकर्ता सुखकर्ता असे दोनदा म्हणतो. तो मला सुखच देतो. माझं दुःख त्याने हरावं, असं मला वाटत नाही. भारतीय शास्त्रीय संगीत हे परमेश्वराचेच रूप आहे. तुम्ही तासभर एकाग्र होऊन संगीत ऐका. ऑफिस मधल्या कटकटी, वरिष्ठांचे फोन, घरगुती समस्या सारे काही विसरून जाल. संगीत तुम्हाला नवीन आनंद, नवीन चेतना, नवी ऊर्जा देईल. तीन तास एखादी संगीताची मैफल ऐकणे, म्हणजे तीन तास परमेश्वराचे ध्यान करण्यासारखेच आहे. संगीताने एकाग्रता, आनंद या गोष्टींबरोबरच आत्मशुद्धीही होते. यामुळे भारतीय शास्त्रीय संगीत लोकप्रिय करणे व त्याचे जतन करणे व श्रवणशक्तीचा विकास हा आसमंतचा मुख्य हेतू आहे.

दरम्यान, समाजातील सर्वसामान्य लोकांपर्यंत



लागवड केलेल्या झाडासोबत नंदकुमार पटवर्धन.

शास्त्रीय संगीत पोहोचवण्यासाठी त्यांनी रत्नागिरी, राजापूर, कणकवली येथे सुप्रसिद्ध गायकांच्या मैफलीचे आयोजन केले आहे. २०१० पासून हा उपक्रम सुरू असून ग्रामीण भागातील रसिकांना शास्त्रीय संगीत ऐकता यावे व या क्षेत्रातील दिग्गज कलाकारांशी संवाद साधता यावा, हा यामागील हेतू आहे. आजवर पं. उदय भवाळकर, कौशिकी चक्रवर्ती, पं. रोणू मुजुमदार, पं. राजन-साजन मिश्रा, पं. अजय चक्रवर्ती, उस्ताद राशिद खान, राहुल शर्मा यांच्या संगीत मैफली झाल्या आहेत. समाजातील बहुसंख्य लोकांनी याचा लाभ घ्यावा, या हेतूने सर्व मैफली सर्वांसाठी विनामूल्य खुल्या ठेवल्या होत्या. त्यांची आसमंत ही संस्था या संगीत मैफलीच्या आयोजनासाठी रत्नागिरीत आर्ट सर्कल, राजापूरमध्ये मित्रमेळा, कणकवली येथे गंधर्व सभा या स्थानिक संस्थांचे सहकार्य घेते.

राजापुरातील धूतपापेश्वर मंदिरात पं. उदय भवाळकर यांचा भगवान शंकराची सांगीतिक पूजा बांधणारा शिवरंजनी कार्यक्रम आयोजित केला होता. यात उत्तर भारतीय संगीतातील अगदी कमी लोकांना माहिती असलेला 'ध्रुपद' गायकी ऐकवून त्यांनी राजापूरवासीयांची उत्स्फूर्त दाद मिळवली. ध्रुपद गायकी ऐकणाऱ्याला समजायला कठीण असते. गाताना तबला व पेटीची साथ नसते. पखवाज व मृदंगाच्या साथीने गाणाऱ्या गायकाला संगीतातील मधल्या जागा भरून काढणारे वाद्य नसल्याने गाण्याच्या वेळेतील ८५ टक्के गावे लागते. नंदकुमार पटवर्धन यांना संगीताची चांगली जाण आहे. त्यांनी जागतिक कीर्तीचे बासरीवादक पं. रोणू मुजुमदार यांची मैफल राजापूर येथे आयोजित केली होती. चारशेहून अधिक रसिक श्रोत्यांसमोर झालेल्या या मैफलीला सुंदर प्रतिसाद मिळाला. दिग्गज कलाकारांच्या जोडीने त्यांनी स्थानिक उदयोन्मुख गायकांनाही व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. भारतीय शास्त्रीय संगीताचा अभ्यास व अध्ययन करू इच्छिणाऱ्यांसाठी आर्थिक मदत देण्याचा आसमंतचा विचार आहे. संगीतातून निरागसता अनुभवता येते. संगीत सर्व काही विसरायला शिकवते, यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. हा आनंद ते स्वतः घेतात व इतरांनाही देतात.

लहान मुलांच्या बाबतीत नंदकुमार पटवर्धन फारच संवेदनशील आहेत. लहान मुलांमध्येच ते परमेश्वराला पाहतात. आजची मुलं ही भविष्यातील पालक असणार आहेत. त्यामुळे त्यांच्या सकारात्मक वृत्ती व चांगली मूल्ये आजच रुजवायला नकोत का? घरच्या गरिबीमुळे पाहिजे, त्या क्षेत्रात जी मुले शिक्षण घेऊ शकत नाहीत, अशा मुलांचा शैक्षणिक भार आसमंत संस्था दरवर्षी उचलते. मुलांमध्ये सकारात्मक भावना वाढीस लावून त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी कार्यशाळा, स्पर्धा व जाणिवा विकसित करण्याचे कार्यक्रम संस्थेतर्फे घेतले जातात. रत्नागिरीमधील निरीक्षणगृह व बालगृहातील विद्यार्थ्यांच्या रोजच्या दूध व न्याहारीसाठी वेळोवेळी आर्थिक मदत संस्था करत आहे.

२०१३ पासून रत्नागिरी व राजापूरमध्ये वर्षातून दोन वेळा आठवड्याभराचे संस्कार शिबिर संस्था आयोजित करत आली आहे. यात मुलांना बौद्धिक, शारीरिक व मानसिक विकासास उपयुक्त गोष्टी शिकवल्या जातात. यामध्ये योगा, नकाशा वाचन, पर्यावरणाबद्दल जाणिवा वाढविणे, प्लास्टिकच्या अतिवापरास आळा, मैदानी व पारंपरिक खेळांचे शास्त्रशुद्ध ज्ञान, व्यक्तिमत्त्व विकास व अभ्यासदौरे यांचा समावेश असतो. संस्थेतर्फे मुलांसाठी घेतली जाणारी पर्यावरणस्नेही गणपती (इकोफ्रेंडली गणेशमूर्ती) ही स्पर्धा संस्थेची वेगळी ओळख बनली आहे. गेली सात वर्षे आर्ट सर्कलच्या मदतीने रत्नागिरीत व तीन वर्षे मित्रमेळाच्या सहकार्याने राजापुरात या स्पर्धेचे आयोजन केले जाते. निसर्गाची ओळख व्हावी आणि त्याच्या संवर्धनात मुलांचा सहभाग वाढावा यासाठी संस्थेने पक्षिमित्र किरण पुरंदरे यांच्या दोन कार्यशाळा घेतल्या. ठाणे जिल्ह्यातील जुचंद्र-वसई येथील प्रसिद्ध रांगोळीकार मीनार पाटील यांची दोन दिवसांची रांगोळी कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी रत्नागिरीत घेतली. शिक्षणापासून वंचित मुलांना आसमंत साह्य करत असते. अत्यंत गरीब व शारीरिक व्यंग किंवा दुर्बलता असलेल्या मुलांची शैक्षणिक फी, शालेय साहित्य देण्यात संस्थेचा नेहमीच पुढाकार असतो.

आज विकसित होत असलेल्या शहरीकरणामुळे

सर्वत्र आरसीसी घरे व बिल्डिंग उभ्या राहत आहेत. किनारे, पाणथळ जागा यांच्यावर भराव टाकला जातोय. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे हवा व पाण्याचे प्रदूषण होत आहे. हे थांबणार नाही, परंतु उत्तम भविष्य काळासाठी निसर्गाला पुन्हा त्याचे वैभव प्राप्त करून देण्याकरिता कोणीतरी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे पटवर्धन यांना वाटते. लोकांची अनास्था आणि इच्छाशक्तीचा अभाव यामुळे निसर्ग संवर्धनासाठी आसमंत संस्था विविध उपक्रमाद्वारे लोकांची मानसिकता बदलू पाहत आहे. याची सुरवात म्हणून आसमंतने 'वनस्पती उद्यान' प्रकल्प हाती घेतला. त्याकरिता रत्नागिरीतील औद्योगिक वसाहतीत ६ एकर जागा संस्थेने भाड्याने घेतली आहे. २०१६ ला इथे वृक्षलागवडीची सुरवात केली. आजमितीला ४२ औषधी गुणधर्म असलेल्या २५० देशी वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन केले जात आहे. वृक्षांची निवड करत असताना औषधी गुणधर्मासोबतच पर्यावरणातील त्या वृक्षाचे स्थान याचाही विचार केला आहे. येथे विविध कीटक, पक्षी यावेत, त्यांचा अधिवास वाढावा व यातून निसर्गाचा समतोल राखण्यास हातभार लागावा, हा हेतू आहे. लवकरच येथे सीडबँक व फुलपाखरू उद्यान सुरू करण्याचा मानस असून निसर्गप्रेमी व अभ्यासकांसाठी हे उद्यान खुले केले जाणार आहे. संस्था, नागरिक व विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक जागृती निर्माण करणारे कार्यक्रम राबवत असते. विद्यार्थी व लोकसहभागाने पारंपरिक जलस्रोत, झरे व नद्या स्वच्छ करून जलसंवर्धन करणे, किनारपट्टीला खारफुटीची लागवड आदी उपक्रम संस्थेच्या माध्यमातून राबवण्याचा पटवर्धन यांचा मानस आहे.

### आसमंतला क्षितिज विस्तारायचे आहे...

* रत्नागिरी- सिंधुदुर्ग जिल्ह्यात आसमंत कार्यरत आहे. * दारिद्र्य वा गरिबीमुळे एकही मूल शिक्षणापासून वंचित राहू नयेत. * सुधारगृह, बालगृहातील मुलांची उत्तम वाढ होण्यासाठी प्रयत्न. * मुलांमधील कौशल्यांचा विकास होईल, अशा कार्यशाळांचे आयोजन. * प्रत्येक मुलामध्ये पर्यावरणाबाबत जागृती निर्माण करणे * मोठ्या प्रमाणावर खारफुटी लावण्याचा कार्यक्रम हाती घेऊन किनारपट्टीचे रक्षण करणे. * पाणथळ जमिनीचा छोट्यात छोटा तुकडाही वनस्पती उद्यान व्हावा व तेथे पक्ष्यांचा अधिवास निर्माण व्हावा. किमान असा परिसर संवर्धन केंद्र म्हणून तयार होऊन तेथे नैसर्गिकरीत्या वाढणाऱ्या प्रजाती मुक्तपणे वाढाव्यात, यासाठी प्रयत्न. * धोक्यात आलेल्या देशी वनस्पतींच्या प्रजाती वाढवण्यासाठी सीडबँक निर्मिती, असे हेतूनिष्ठ काम आसमंत करत आहे.

### तुमचा सहभाग मोलाचा....

* आसमंतच्या शिबिरे, चळवळी व उपक्रमामध्ये तुम्ही कार्यकर्ता म्हणून सहभागी होऊ शकता. * ८० जी खाली मान्यताप्राप्त संस्था * विविध कंपन्या त्यांच्या सीएसआर ॲक्टिव्हिटीसाठी आसमंत सोबत संयुक्त कार्यक्रम घेऊ शकतात किंवा सीएसआर फंडाद्वारे संस्थेचे उपक्रम वा कार्यक्रम पुरस्कृत करू शकतात. * पाणलोट क्षेत्रात वनस्पती उद्यान, पक्षी उद्यान निर्मितीसाठी मदत करू शकता.

**संपर्कासाठी पत्ता :**

**आसमंत बेनोव्हलन्स फाउंडेशन, पीएम ७५, एमआयडीसी, मिरजोळे, रत्नागिरी- ४१५६३९, महाराष्ट्र, भारत. संपर्क- ९१२३५२२२८६७३, २२८५१६, ०९९७००५६५२३.**
**इमेल- info@aasamant.org,**
**URL- http://www.aasamant.org/**

संस्थेचे सल्लागार वेळोवेळी मार्गदर्शन करतात. आसमंतच्या कार्यालयातील सर्व मंडळी आपुलकीने कोणत्याही मानधनाची अपेक्षा न ठेवता मदत करतात. नंदकुमार पटवर्धन सर्वत्र आनंद पाहतात. त्यामुळे आसमंत ही आनंदाने भरून वाहणारी नदी आहे. तिचा उगम दत्तगुरूंच्या झोळीत असून शास्त्रीय संगीताच्या सागराला जाऊन ती मिळते. तिच्या दोन्ही किनाऱ्यावर असणाऱ्यांनी ज्याच्या त्याच्या क्षमतेनुसार या नदीतील आनंद कुवतीनुसार घ्यावयाचा आहे, असे पटवर्धन सांगतात.

## 'वृक्षवल्ली' नंदकुमार पटवर्धन

अनेक व्यक्ती जीवनात आपल्याला भेटतात. पण त्यापैकी काहीच आपल्या मनावर ठसा उमटवतात. श्री. नंदू पटवर्धन हे त्यातलेच. कीर्तनकार जसे रंगून कीर्तन करतात, अगदी तसेच तन्मय होऊन विविध वृक्षांवर निरूपण करणाऱ्या पटवर्धन यांना आम्ही प्रेमाने 'वृक्षवल्ली' म्हणतो. आम्ही त्यांचे एमआयडीसीमधील वनस्पती उद्यान बघायला गेलो. त्यांनी आवारातील प्रत्येक झाडाचे मराठी बोलीभाषेत व लॅटिन भाषेतले शास्त्रीय नाव असे विवरण असलेला कागद दिला. आमचा वृक्षांच्या जगातली एक आगळी वेगळी सफर सुरू झाली. अर्जुन, सीता-अशोक, बकुळ, आवळा, काटेसावर... ही सगळी आपल्याच कुटुंबातील सदस्य असल्यासारखे ते प्रभावीपणे माहिती देत होते. त्या अद्भुत जगात वावरताना मी त्यांची तळमळ बघून अवाक् होत होतो. पाणी झाडाला फक्त जगण्याएवढेच द्यावे... अती घालू नये व या विधानामागची त्यांची फिलॉसॉपी उच्च होती.

कुठलेही झाड उत्पन्न डोळ्यासमोर ठेवून लावलेले नाही. कदंबाचे झाड हे पक्षांसाठी लावले आहे, हे ऐकल्यावर मला असा विचार करणारे लोक जगात आहेत, याचेच कौतुक वाटले. पटवर्धनांच्या वाणीतून वनस्पतींची नावे व त्यातील बारकावे यांच्या माहितीचा खळाळता प्रवाह अथक सुरू होता. ती झाडे लावण्याकामी प्रचंड मेहनत झाली आहे, हे समजते. माहिती ऐकताना पटवर्धन आपल्या परिवारातील सदस्यांबद्दल सांगताना एखाद्या मुरलेल्या गायकासारखे तल्लीन होतात आणि भरभरून माहिती सांगतात. झाडांना वाढवताना / रोगराईचा समाचार घेताना काय उपाय करावे? त्याचे तत्त्वज्ञान लगेच पटतं. पटवर्धन निसर्गमित्र आहेत, हे ते हा प्रकल्प पाहताना प्रकर्षाने जाणवते. ठराविक झाडावर ठराविकच फुलपाखरे बसतात व ती फुलपाखरे अन्य झाडावर बसत नाहीत, ही माहिती आम्हाला चकित करून गेली. पाण्याची केलेली सोय, झाडं लावण्यात ठेवलेली शिस्त, झाडांची निवड, एका निसर्गप्रेमी माणसाची धडपड, सर्वच सॅल्यूट करण्यासारखे.

मला खात्री वाटते, की काही वर्षांत या वनस्पती उद्यानाचे रूप खूप पालटेल. एका माणसाने निसर्गाच्या जवळ जाऊन अपार कष्ट करून एक वेगळी बाग निर्माण केली आहे. आसमंत बेनेवोलन्समधला शब्दशः बेनेवोलन्स स्वतः अनुभवायला मिळाला. या बद्दल मी देवाचे आभार मानतो आणि आसमंत बेनेवोलन्सने अनेकांना अशीच प्रेरणा देत राहावे, ही ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

- डॉ. नीलेश नाफडे

> वनस्पती उद्यानाला भेट दिली. विविध वनस्पतींची लागवड पाहून अतिशय आनंद वाटला. मी स्वतः वनस्पतिशास्त्राचा विद्यार्थी असल्यामुळे मला फार कौतुक वाटले. येत्या ५ वर्षांत या जागेचा कायापालट होईल.
>
> - अरविंद उंटवाले, जनरल सेक्रेटरी, मॅंग्रूव्ह सोसायटी ऑफ इंडिया निवृत्त सहसंचालक, राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्था, गोवा.



आसमंत बेनेवोलन्स फाउंडेशनच्या वनस्पती उद्यानाचा निसर्गरम्य परिसर.